जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in


पुणे पोलीस

**प्रेसनोट क्र. ४६२ दि.०६/०३/२०२०**

## सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे शाखा पुणे शहर

## ऑनलाईन ऍस्कॉर्टींग मधील चार परदेशी व दोन भारतीय पिडीत महिलांची सुटका

दि.०५/०३/२०२० रोजी सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे शाखा पुणे कडील पोलीस कॉन्स्टेबल संतोष भांडवलकर व पुष्पेंद्र चव्हाण यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, इसम नामे मॉन्टी हा हाय प्रोफाईल विदेशी महिला व मुलींना वेश्या व्यवसायासाठी पुरवत असुन त्यासाठी तो मोबाईल नंबर व वॉट्स ॲप चा वापर करीत आहेत. वगैरे मिळाले बातमीची खात्री करुन कारवाई करणेकामी सेन्च्युरीयन हॉटेल शिवाजीनगर पुणे येथे बनावट गि[illegible]ाईक पाठवून सापळा रचला असता, तेथे सदर इसमाने एक विदेशी महिला वेश्यागमनासाठी पाठवली. तिला ताब्यात घेवुन अधिक चौकशी केली असता, तिने सदर इसम मॉन्टी हा आणखी महिलांकडुन वेश्याव्यावसाय करवुन घेत असुन सदर महिला/ मुलींना बिझ तमन्ना हॉटेल, हिंजवडी पुणे येथे ठेवले असल्याचे सांगितले. त्यावरुन महिला पोलीस स्टाफसह सदर ठिकाणी जावुन खात्री केली असता, तेथे कझाकीस्तान देशाची १ महिला, उझबेकीस्तान देशाच्या २ महिला, नेपाळ देशाची १ मुलगी व भारतीय २ मुली मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन सुरक्षिततेकामी रेस्क्यु फाउंडेशन येथे ठेवण्यात आले असुन सदर फरार आरोपी मॉन्टी उर्फ जगन्नाथ अर्यल याचे विरुध्द शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा येथे चालु आहे.

सन २०१८ ते फेब्रुवारी २०२० आखेर पिटा अंतर्गत पुणे शहरात १२३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामध्ये पिटा अंतर्गत सुटका करण्यात आलेल्या पडित महिलांची माहिती खालील प्रमाणे.

| अ.क्र. | सन | दाखल गुन्हे | पिडित महिला | | | मायदेशी पाठविण्यात आलेल्या परदेशी महिला |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | भारतीय | परदेशी | एकूण | |
| १ | २०१८ | ४५ | ११४ | ३१ | १४५ | २१ |
| २ | २०१९ | ६६ | १३२ | ६० | १९२ | ४० |
| ३ | आज रोजी २०२० पर्यंत | १३ | ४२ | ५ | ४७ | ०६ |
| **एकूण** | | **१२४** | **२८८** | **९६** | **३८४** | **६७** |

वरील नमुद कारवाई श्री. अशोक मोराळे अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.बच्चन सिंग पो.उप.आयुक्त गुन्हे, सहा. पोलीस आयुक्त प्रतिबंधक गुन्हे, श्री. शिवाजी पवार यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ट पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली चांदगुडे, पोउपनिरीक्षक श्रीधर खडके व सामाजिक सुरक्षा विभागाकडील पोहवा कुमावत, मपोना पुकाळे, मपोना शिंदे, मपोना केकान, पोना माने, पोना कर्पे, पोना. पठाण पोकॉ खाडे, पोकॉ चव्हाण, पो.शि.कोळगे,पोकॉ भांडवलकर, ,यांनी केलेली आहे.